**मे. न्यायाधीश सहकार न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.**
**(मा.सौ.ए.व्ही.जाधव- न्यायाधीश यांचे समोर)**

**ल.मु.क्र. १७४/२०१७**

अहमदनगर शहर सहकारी बँक लि., ---- **वादी.**

***विरुध्द***

१) डॉ. उज्वला रविंद्र कवडे ---- **प्रतिवादी.**

व इतर.

**निशाणी- १०० वरील आदेश.**

(दि.१५/११/२०१८ रोजी पारीत)

१) प्रतिवादी क्र. १, ३, ४ व ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुध्द झालेला "कैफियत नाही" चा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केला असुन ते विनंती करतात की, सदरचा अर्ज मंजुर करावा.

२) वादींनी निशाणी-१०२ वर अर्जास म्हणणे दिले असुन कथन केले आहे की, प्रतिवादींनी केलेला अर्ज हा मोघम असुन कायद्यातील तरतुदी विरुध्द आहे. प्रतिवादी दाव्यात हजर झाल्यानंतर त्यांनी वेळोवेळी मुदती घेतल्या मुळे त्यांच्या विरुध्द कैफियत नाहीचा आदेश झाला. प्रतिवादींनी योग्य व संयुक्तिक कारण अर्जात दिलेले नसल्याने प्रतिवादीं विरुध्द झ ालेला "कैफियत देणे नाही" चा आदेश रद्द करुन मागण्याचा त्यांना हक्क व अधिकार नाही.

३) वादी तर्फे वकील श्री. के. एम. देशपांडे तर प्रतिवादी तर्फे वकील श्री. बी. एस. काकड यांचा युक्तिवाद ऐकला.

**कारणमिमांसा**

४) प्रतिवादींच्या युक्तिवादानुसार प्रतिवादींनी दि.२४/१२/२०१७ रोजी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ११ नियम १४ प्रमाणे अर्ज दिलेला होता, परंतु सदरचा अर्ज तरतुदीप्रमाणे

नसल्याचे वादी बँकेने खुलासा दिल्यावरुन त्यांनी क्रम ११ नियम १ प्रमाणे दि.२६/०४/२०१८ रोजी अर्ज दिला. वादी बँकेने सदरच्या अर्जावर खोटे उत्तर दाखल केले व प्रतिवादींनी मागणी केलेल्या परिप्रश्न (Interrogatories) उत्तर दिलेले नाही. प्रतिवादींच्या युक्तिवादानुसार दाव्याचा कायदेशीर निकाल देण्यासाठी प्रतिवादींची कैफियत रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे.

५) प्रतिवादींनी त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ठार्थ खालील नमुद मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाचे निकाल संदर्भांकित केले.

1) *Sambhaji & Ors. Vs. Gangabai & Ors. Hon'ble Supreme Court cases 2008.*
2) *Chandrakant Rajaram Kharote Vs. Smt. Parvatabai Dattatraya Khoje & Ors. Hon'ble High Court OF Bombay bench at Aurangabad, 2016.*
3) *Smt. Taramati Parshuram Mankavale Vs. Mahendra Bhargav Mohite & Ors. Hon'ble High Court Bombay, 10 October, 2018.*
4) *Syndicate Bank Vs. Shri. K. S. Rajshekher Trading- 2002(2) ALL MR 886, High Court Of Bombay bench at Panaji.*
5) *Kusum Vs. Kanchan Devi and Ors. Supereme Court, 2005.*

६) वादींनी त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ठार्थ खालील नमुद मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाचे निकाल संदर्भांकित केले.

1) *Kailas Vs. Nanhku, Supreme Court, 2005.*
2) *Pandurang alias Shashi Dessai Vs. Bearaldin Tavaeres, Bombay High Court, 2006.*
3) *Aditya Hotels (P) Ltd. Vs. Bombay Swadeshi Stores Ltd. and Ors., Supreme Court, 2007.*

७) प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्याकरीता **दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ८ चे नियम १** चे अवलोकन केले जो खालीलप्रमाणे आहे.

**“क्रम ८ नियम १ प्रतिवादपत्र :-**

(१) *प्रतिवादी, त्याच्यावर समन्स बजावल्याच्या दिवसापासून तीस दिवसांत त्याच्या बचावाचे प्रतिवादी पत्र सादर करील.*

(२) *परंतु उक्त तीस दिवसांच्या मुदतीने प्रतिवादीपत्र दाखल करण्यात प्रतिवादीने कसूर केल्यास न्यायालयाने विनिर्दिष्ट केला असेल अशा अन्य दिवशी ते कारणे लेखी नमूद करुन दाखल करता येईल. मात्र असा दिवस समन्स बजावल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांपेक्षा नंरतचा असणार नाही.*

(३) *न्यायालय पोटनियम (५) खाली परवानगी देईल तेव्हा त्याने तसे करण्या बद्दलची आपली कारणे नमूद केली पाहिजेत आणि पोटनियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीमध्ये दस्तऐवज न नोंदण्याबद्दल न्यायालयाचे समाधन होईल असे सबळ कारण दाखवून दिल्याखेरीज, अशी कोणतीही परवानगी दिली जाणार नाही.*

८) वरील कलमान्वये प्रतिवादींना समन्सची बजावणी झाल्यानंतर त्यांनी तीस दिवसाच्या आत दाव्यात कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. तीस दिवसाच्या आत प्रतिवादी कैफियत दाखल करु न शकल्यास न्यायालयाचे समाधान होईल असे सबळ कारण दिल्यानंतर नव्वद दिवसाच्या आत प्रतिवादी कैफियत दाखल करु शकतात.

९) दाव्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी दाव्यात हजर झाल्यानंतर त्यांनी निशाणी-५ च्या मनाई हुकूमाच्या अर्जास म्हणणे देण्यास व दाव्यात कैफियत दाखल करण्यासाठी वादींकडून काही कागदपत्रांची मागणी केली. प्रतिवादींनी दाव्यात कैफियत

दाखल केली नाही म्हणुन त्यांच्याविरुध्द दि.१६/०२/२०१८ रोजी कैफियत नाहीचा आदेश करण्यात आला. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या दाव्यास निशाणी-७६ वर क्रम ११ नियम १, ८, ९ प्रमाणे परिप्रश्न (Interrogatories) दाखल केली व वादींकडून काही दस्तांची व प्रश्नांच्या उत्तरांची मागणी केली. सदर अर्जावर वादी बँकेने म्हणणे दिले व दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्यानंतर दि.२३/०७/२०१८ रोजी त्यावर आदेश करण्यात आला. त्यानंतर वादींनी वेळोवेळी परिप्रश्नाचे उत्तरे देण्यासाठी वेळेची मागणी केली व दि.२१/०९/२०१८ रोजी निशाणी- ९७ वर परिप्रश्नाचे उत्तर दिले व त्यासोबत काही कागदपत्रेही दाखल केलीत. प्रतिवादींना प्रश्नावली व कागदपत्रांची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी दि.१२/१०/२०१८ रोजी कैफियतीसह प्रस्तुतचा अर्ज दाखल केला. संपुर्ण दाव्याचे अवलोकन केले असता प्रतिवादींनी त्यांना वादीकडून कागदपत्र व प्रश्नांची उत्तरे मिळाल्यानंतर तात्काळ त्यांच्या कैफियती दाखल केल्या.

१०) प्रस्तुतच्या दाव्यात वादी बँकेने प्रतिवादींकडून मोठयाप्रमाणवर कर्जाऊ रक्कमेची मागणी केली असुन प्रतिवादींच्या मिळकतीही जप्त करुन मागीतल्या आहेत. तसेच निशाणी-५ वर आदेश करुन प्रतिवादींच्या मिळकती दावा निवाडया पुर्वी जप्त करण्यात आलेल्या असुन त्यांच्या विरुध्द मनाई हुकूम दिलेला आहे. दाव्यात मागणी केलेली रक्कम **रु.७,९१,०१,८५१=५०** पैसे इतकी असल्याने व प्रतिवादींचे मिळकतींमधील हितसंबंध विचारात घेता प्रतिवादींच्या कैफियती दावा गुणदोषाच्या आधारे निकाली काढण्याकरिता अत्यंत आवश्यक असल्याने प्रतिवादीं विरुध्द कैफियत नाहीचा आदेश हा न्यायाच्या दृष्टीने रद्द करणे योग्य होईल. प्रतिवादींनी दाव्यात कैफियत देण्यास केलेला उशिर हा त्यांच्यावर खर्चाची भरपाई (Compensatory costs) लादून करता येईल.

११) वादी व प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्याकरिता दाखल केलेले संदर्भिय न्यायालयीन निकालांचे अवलोकन केले असता मा. उच्च न्यायालयाने असे गृहित धरले आहे की, प्रतिवादींनी झालेला उशीर समाधानकारकरित्या कारणे देऊन सिध्द केल्यास त्यांच्या कैफियती रेकॉर्डवर घेतल्या जावू शकतात. दाव्यातील प्रतिवादींनी त्यांच्या कैफियती देण्यास का ऊशीर झाला हे समाधानकारक रित्या सिध्द केल्याने त्यांच्या कैफियती दाव्यात सामील करुन पुराव्याकामी वाचण्यात येत आहे.

वरील कारणमिमांसेवरुन मी, खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१) प्रतिवादी क्र. १, ३, ४ व ५ यांचा अर्ज प्रत्येकी खर्चाची रक्कम रु.२००/- या न्यायालयात भरण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. १, ३, ४ व ५ यांच्या विरुध्द झालेला कैफियत देणे नाहीचा आदेश रद्द करण्यात येत असुन त्या सोबत त्यांनी दाखल केलेल्या कैफियती वाचून दाव्यात सामिल करण्यात येत आहेत.

३) प्रतिवादी क्र.१,३,४ व ५ यांनी खर्चाची रक्कम १५ दिवसांच्या आत न्यायालयात न भरल्यास वरील आदेश आपोआप रद्द होईल.

४) खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांक : १५/११/२०१८
अहमदनगर

(सौ.ए.व्ही.जाधव)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय,अहमदनगर.